# धुळे महानगरपालिका
# नोटीस बोर्ड

जा.क्र./धुमपा/आयुक्त कार्यालय/ १९ /२०२५ दिनांक १०/१२/२०२५

## धुळे महानगरपालिका

**भटक्या श्वानांच्या तक्रारींकरीता हेल्पलाईन क्रमांक**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण व जंत निर्मुलन करणे यासाठी भटक्या श्वानांबाबतच्या तक्रारींसाठी मनपाने भटक्या श्वानांना खाद्य भरविण्यासाठी निश्चित केलेल्या जागांविषयीच्या तक्रारींसाठी व भटक्या श्वानांच्या अनुषंगाने इतर सूचना व तक्रारी दाखल करण्यासाठी मदत कक्ष व हेल्पलाईन क्रमांक निश्चित केला आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना भटक्या श्वानांच्या अनुषंगाने काही सूचना व तक्रारी नोंदवायच्या असल्यास त्यांनी खालील ठिकाणी व खाली नमूद हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्काचा पत्ता : मदत कक्ष, पहिला मजला, नूतन प्रशासकीय इमारत, धुळे महानगरपालिका**
**हेल्पलाईन क्रमांक : १८००२३३३३०१०**

10.12.2025

(नितीन कापडणीस)
आयुक्त तथा प्रशासक
धुळे महानगरपालिका

---

## धुळे महानगरपालिका

महानगरपालिका प्रशासकीय इमारत गुरु शिष्य स्मारक साक्री रोड धुळे ४२४००१
दुरध्वनी क्र ०२५६२ - २८८३०१ / २८८३१० Email Id — dhule_dmc@rediffmail.com

जा.क्र./धुमपा/आयुक्त कार्यालय/ २२ /२०२५ दिनांक १०/१२/२०२५

**विषय** :- महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांसाठी आहार क्षेत्राची (Feedign zones) निश्चिती.

**संदर्भ** :- मा. सर्वोच्च न्यायालयाचे SUO MOTO WRIT PETITION (civil) No (S).५ Of २०२५ प्रकरणामध्ये दि. ११.०८.२०२५ दि. २२.०८.२०२५ दि. ०३.११.२०२५ व दि. ०७.११.२०२५ रोजीचे न्यायालयीन निर्णय.

### जाहिर सूचना

मा. सर्वोच्च न्यायालयाने SUO MOTO WRIT PETITION (civil) No (S).५ Of २०२५ मधील निर्देशांनुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रात (Feeding Zones) निश्चित करण्यात आले आहेत. या आहार क्षेत्रांची यादी महानगरपालिकेच्या https://dhulecorporation.org/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

यानुसार धुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीक, स्वयंसेवी संस्था यांना सुचित करण्यांत येते की, त्यांनी महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांसाठी या यादीत नमूद केलेल्या ठिकाणीच खाद्य टाकण्याची व्यवस्था करावी. या ठिकाणांव्यतिरिक्त अन्य ठिकाणी मोकाट कुत्र्यांना कोणताही नागरीक, स्वयंसेवी संस्था खाद्य टाकतांना आढळल्यास नागरीकांनी तात्काळ महानगरपालिकेच्या १८००२३३३३०१० या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून तक्रार नोंदवावी.

10.12.2025

(नितीन कापडणीस)
आयुक्त तथा प्रशासक
धुळे महानगरपालिका